॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥

# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई-प्रशिक्षक

वर्ष २ : अंक ३ / डिसेंबर २०१४









परिसर अभ्यास सहली



कोकणातील अभ्यास सहल




सहलीसाठी उपयुक्त पुस्तके

www.erc-pune.org

# संपादकीय

सस्नेह नमस्कार !

'प्र' शिक्षकचा हा अंक सहलींबद्दल चर्चा करणारा आहे. डिसेंबर-जानेवारी महिने म्हणजे शालेय सहलींचे दिवस. शैक्षणिक सहली हा सहशालेय अभ्यासक्रमातील महत्त्वाचा भाग. एक दिवसाच्या सहलीपासून ते आठ-दहा दिवसांच्या मोठ्या सहली शाळांद्वारे काढल्या जातात. अलिकडच्या काळात सहलींचे कंत्राट देण्याकडे अनेक शाळांचा कल वाढतो आहे. सहलींची पॅकेजेस देणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या वाढते आहे. त्यामुळे सहलींचे शैक्षणिक मूल्य कमी होऊन करमणूक मूल्य वाढताना दिसते आहे.

शैक्षणिक सहली आखताना करमणूक, यात्रास्थाने, अम्यूझमेंट्स पार्कस् यांना कमी महत्त्व असावे. अशा ठिकाणी शिक्षण होतच नाही असे नाही परंतु योजताना होणाऱ्या कष्ट आणि खर्च या मानाने ते कमी असते. मुलांचे वय, अभ्यासक्रम, अनुभवविश्व यांचा जरूर विचार केला पाहिजे. सहलींच्या आयोजनात नियोजनाचे खूप महत्त्व असते. सहलींचा ठसा मुला-मुलींच्या मनावर खोलवर पडतो. त्यामुळे सहल हा एक विलक्षण अध्ययन अनुभव असतो.

सहलींचे अनेक प्रकार पडतात. परिसर अभ्यास, भौगोलिक सहली, ऐतिहासिक स्थळांच्या सहली, सामाजिक अभ्यास, डोंगरयात्रा अशा अनेक प्रकारच्या सहली काढता येतात. सहलीच्या उद्दिष्टांनुसार तयारीचे मुद्दे बदलतात. सहलींच्या नियोजनात विद्यार्थ्यांचा जेवढा सहभाग घेऊ तेवढे चांगले! मार्ग ठरविणे, तिकिटे काढणे, निवास-भोजन व्यवस्था करणे, सहल स्थळे व त्यांच्याशी संबंधित इतिहास, भूगोल, घटना यांचा पूर्व अभ्यास करणे यासारख्या कामात विद्यार्थी सहभागी होताना खूप काही शिकतात. सहलींचे वृत्तांकन करणे आवश्यक समजावे! त्यामुळे विद्यार्थी सहलीत गांभिर्याने सहभागी होतात. करमणुकीची सहल (Picnic) वेगळी आणि शैक्षणिक सहल वेगळी हे मुलांना समजू लागते.

अशा सहलींच्या आयोजनाचे आपले अनुभव 'प्र'शिक्षककडे जरूर पाठवावे!

प्रा. विवेक पोंक्षे

प्रदूषण, जैवविविधता, पर्यावरण हे विषय सध्या चर्चेचे केंद्रबिंदू आहेत. पर्यावरणाच्या समस्या समजून घ्यायच्या, त्यावर मात करायची तर पर्यावरणाचा अभ्यास करणे ओघाने आलेच. पर्यावरणाचा अभ्यास म्हणजेच परिसर अभ्यास. आज शालेय अभ्यासक्रमात परिसर अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय म्हणून समावेश झाला आहे. 'परिसर अभ्यास' हा व्यापक विषय आहे. अध्यापक कोणत्याही विषयाचा विषय अध्यापक असला तरी परिसर अभ्यास सर्वांशी संबंधित आहे, त्यामुळे परिसर अभ्यास विषयाचे अध्यापन सर्व विषय शिक्षक मिळून करू शकतील.

परिसर अभ्यासाची सुरुवात घरापासून होते. आपल्या घरातील माळ्यांवर फटींतून, दमट जागी विविध कीटकांचे वास्तव्य असते, घरात वर्षभरात विविध पक्षी येत असतात. विद्यार्थ्याला अशा गोष्टींची नोंद कशी ठेवायची याचे मार्गदर्शन केले पाहिजे.
घरानंतर क्रमाने अंगण/परसदार शाळा, शहरातील बागा, टेकडी, जंगल अशा क्रमाने परिसर अभ्यास केला पाहिजे. परिसर अभ्यासाचे अध्यापन करताना एकदम जंगलात सहल काढण्याची गरज नसते व ते उपयुक्त नसते. विद्यार्थ्याला प्रथम त्याच्या परिसरातील गोष्टींचा अभ्यास करता आला पाहिजे.

परिसराचा अभ्यास करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्याचे निरीक्षण होय. आपला परिसर दोन प्रकारच्या घटकांनी बनलेला असतो.

१) **नैसर्गिक घटक**

अ)प्राकृतिक घटक-यात जमीन, माती, खडक, पाणी (झरे, ओढे, नद्या, तलाव इ.), आकाश (दिवसाचे व रात्रीचे) इ.

ब) **सजीव घटक**- सूक्ष्म जीव, कीटक, जलचर, सरीसृप, पक्षी, सस्तन प्राणी- वन्य, पाळीव प्राणी, वनस्पती इ. चा समावेश होतो.

२) **सांस्कृतिक घटक** - हे मानवनिर्मित असून ह्यात घर, नगरे, वस्त्या, सण, उत्सव, जीवन पद्धती, व्यवसाय, लोकजीवन इ. घटकांचा समावेश होतो.

हे घटक एकमेकांत गुंतलेले, एकमेकांवर अवलंबून असलेले असे आहेत. त्यामुळे विविध प्रकारच्या नातेसंबंधांचे एक भव्य परंतु क्लिष्ट जाळेच निर्माण झाले आहे. या जाळ्यातील एखाद्या छोट्याशा जाळ्यातील एखाद्या छोट्याशा घटकाचा अभ्यास करायचा तरी सारे आयुष्य पुरणार नाही. मात्र यातल्या अनेक घटकांचा परिचय करून घेणे शक्य आहे. त्यासाठी 'परिसर सहल' हा उत्तम मार्ग आहे.

**परिसर सहलीची उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल, आपल्या परिसराबद्दल प्रेम/आत्मीयता निर्माण होणे.
२) विद्यार्थ्यांना पर्यावरणातील घटक, समस्या इ. चा परिचय करून देणे व समस्यांबद्दल जाणीवजागृती करणे.
३) विद्यार्थ्यांना परिसर संवर्धन, संरक्षणाची गरज, विकासातील महत्त्व इ. ची ओळख व्हावी.
४) विद्यार्थ्यांना नैसर्गिक संपत्तीची ओळख व्हावी.
५) विद्यार्थ्यांना परिसर निरीक्षणातून मिळणाऱ्या निखळ, नैसर्गिक आनंद मिळवण्याच्या मार्गाची माहिती/ परिचय व्हावा.

अशा अनेक उद्दिष्टांबरोबर सहाध्याय दिनाच्या सर्व उद्दिष्टांचा जसे प्रसंगावधान, निर्णयशक्ती, समूहभावना इ. चा समावेश ओघाने येईलच.

**परिसर सहल 'निरीक्षण' उद्दिष्ट निश्चिती**

परिसर अभ्यास विषय व्यापक असल्याने प्रथम आपण कशाचा अभ्यास करणार आहोत ते निश्चित करावे. परिसर सहल काढण्यापूर्वी आपण नक्की कशाचे निरीक्षण, अभ्यास करणार हे निश्चित करावे. पक्षी पाहणार की फुलपाखरे? आकाश निरीक्षण की वनस्पती गोळा करणार? आपल्या हेतूनुसार सहलींचे ठिकाण ठरेल. ज्या घटकांचे निरीक्षण करायचे त्या घटकांशी संबंधित माहितीपुस्तके, मार्गदर्शिका, छायाचित्रे गोळा करावीत. त्या क्षेत्रातील तज्ज्ञांशी पूर्वचर्चा करावी. शिक्षकाने स्वतः या गोष्टीचे प्रशिक्षण घ्यावे वा शक्य झाल्यास बरोबर तज्ज्ञ मार्गदर्शक घ्यावा.

जवळ जवळ प्रत्येक महिन्यामध्ये काही ना काही पाहण्यासारखे असते. प्रत्येक ऋतूची स्वतःची वैशिष्ट्ये आहेत, गुणधर्म आहेत. त्यानुसार निरीक्षणाचे विषय बदलतील. सोबत ऋतुमानाप्रमाणे कोणत्या गोष्टींचे निरीक्षण करता येऊ शकते याचा ढोबळ वार्षिक तक्ता देत आहे.

**वार्षिक तक्ता -**

१) जून ते सप्टेंबर –
पावसाळी वनस्पती, कीटक, जलचर, फुलपाखरे, सर्प, ढगांचे प्रकार, इंद्रधनुष्य, पाण्याची विविध रूपे इ.

२) ऑक्टोबर ते नोव्हेंबर –
फुलपाखरे, हिवाळी स्थलांतरित पक्षी, आकाश निरीक्षण (उल्कावर्षाव) इ.

३) डिसेंबर ते फेब्रुवारी –
हिवाळी स्थलांतरित पक्षी, सागरी जीवन, आकाश निरीक्षण, खडक/खनिजे, वनस्पती इ.

४) मार्च ते मे –
ग्रीष्मात बहरणाऱ्या वनस्पती, वन्यप्राणी, आकाश दर्शन इ.

---

**स्थान निश्चिती**

परिसर अभ्यास सहलीचे स्थान निश्चित करताना खालील गोष्टींचा विचार करून मगच स्थान निश्चित करावे.

१) अभ्यासाचा/निरीक्षणाचा हेतू
२) ऋतू
३) उपलब्ध वेळ
४) खर्चाच्या मर्यादा
५) वाहतूक सुविधा
६) तज्ज्ञ/माहितगाराची उपलब्धता
७) विद्यार्थी संख्या व मार्गदर्शक अध्यापकांचे प्रमाण (१ अध्यापक व ५ विद्यार्थी हे प्रमाण आदर्श आहे ; पण आजची विद्यार्थी संख्या लक्षात घेता १:२० हे प्रमाण निश्चित असावे. २० पेक्षा जास्त विद्यार्थी एका अध्यापकाबरोबर असू नयेत.)

* **परिसर सहलीस बरोबर घ्यावयाच्या वस्तू/उपकरणे**
१) मार्गदर्शक पुस्तके/नकाशे
२) नोंद वही व पेन/पेन्सिल
३) होकायंत्र
४) दुर्बिण (७ ५०)
५) भिंग
६) बॅटरी, दोरा, ब्लेड/चाकू

* **व्यवस्थात्मक मुद्दे**
१) प्रवास व्यवस्था (आरक्षण, स्थानिक वाहतूक इ.)
२) साहित्य व्यवस्था (सामूहिक व वैयक्तिक साहित्य)
३) निवास व्यवस्था– भोजन व्यवस्था
४) वैद्यकीय व्यवस्था
५) स्थानिक वाटाड्याची उपलब्धता

* **पूर्व तयारी**
१) परिसर अभ्यासाचा जो विषय निश्चित केला असेल, त्या विषयासंबंधी सोपी, छोटी पुस्तके विद्यार्थ्यांना सहलीपूर्वी वाचण्यास द्यावीत.
२) तज्ज्ञ व्यक्तीचे व्याख्यान, चित्रपट्टिकांचा कार्यक्रम सहलीपूर्वी आयोजित करावा.

३)	उपलब्ध व्हिडीओ कॅसेट्स दाखवाव्यात.

४)	विद्यार्थ्याला नकाशावाचन, नकाशा तयार करणे,दिशा ओळखणे, अंतराचा अंदाज करता येणे इ. गोष्टींची माहिती करून द्यावी व त्याचा सराव घ्यावा.

५)	परिसरात वावरत असताना काय करावे व काय करूनये यासंबंधी सूचना द्याव्यात. (उदा. जंगलात जर प्राणी निरीक्षणासाठी/पक्षी निरीक्षणासाठी गेला असाल तर कसे वागावे, कोणती काळजी घ्यावी की जेणे करून आपले निरीक्षण आपणास उपलब्ध होईल यासंबंधी सूचना द्याव्यात, जसे चालताना कोणत्या दक्षता घ्याव्यात इत्यादी.)

६)	नोंद वहीत नोंदी कशा व कोणत्या कराव्यात, कोणते नमुने गोळा करावेत, त्यांचे संकलन कसे करावे ह्या संबंधात माहिती द्यावी.

**✻	परिसर अभ्यास सहलीनंतर करावयाची कामे**

१)	गोळा केलेल्या विविध नमुन्यांचे वर्गीकरण व नमुन्यांचे शालेय संग्रहालयात योग्य तऱ्हेने संग्रहण करणे.

२)	नोंदवहीतील नोंदीनुसार प्रत्येक विद्यार्थ्याने व अध्यापकाने माहितीचे संग्रहण करून परिसर भेटीचा वृत्तांत तयार करणे.

३)	साधनव्यक्तींना आभार-पत्र पाठविणे.

४)	विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे मनोगत लेखन.

५)	'परिसर' अभ्यास हा विषय वर्गात 'खडू-फळा' वापरून शिकविण्याचा, अध्यापन करण्याचा नाही. परिसर अभ्यासाची सर्वोत्तम अनुभूती परिसर सहलीतूनच देता येते. ह्यासाठी प्रथम शालेय बागेपासून सुरुवात करून क्रमाक्रमाने जंगलापर्यंतचे अनुभव विद्यार्थ्यांना द्यावेत. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्यांचे निरीक्षण गट (पक्षी अभ्यास गट, वनस्पती अभ्यास गट आदी) तयार झाल्यास विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत परिसराच्या सर्व घटकांची ओळख करून देता येईल व परिसर अभ्यासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या जवळ जाता येईल.

प्रा. संजीव नलावडे
फर्गसन महाविद्यालय, पुणे
(प्रशिक्षक वर्ष ३, अंक ६ मधनू पुनर्मुद्रित)












# कोकणातील अभ्यास सहल



परवा सहज जुन्या वह्या, कागदपत्रे पाहात असताना एक जुने सहलवृत्त सापडले. दहा वर्षांपूर्वीच्या आमच्या सहलीच्या वेळी केलेल्या डायरीतील नोंदी चाळता चाळता मन आठवणीत मागे गेले.

मे महिन्यातील दहावीचे जादा तास चालू झाले. तेव्हा एके दिवशी रत्नागिरीच्या 'गोगटे जोगळेकर महाविद्यालया'चे प्रा. सुरेंद्र ठाकूरदेसाई यांचा 'कोकणातील भौगोलिक वैशिष्ट्ये' या विषयावर स्लाईड शो होता. स्लाईड शोनंतरच्या प्रश्नोत्तर व गप्पांत पाठ्यपुस्तकात अभ्यासलेली समुद्र खाडी आदी भौगोलिक वैशिष्ट्ये, जी सरांनी स्लाईडमधून दाखवली होती ती पाहण्यासाठी सुरेंद्र सरांबरोबर कोकण अभ्यास सहलीला जायचे ठरवले. 'सहलीची तयारी तुमची तुम्ही करणार असाल तर सहलीला परवानगी आहे', असे प्राचार्यांनी सांगितले.

मग काय, रोज सहलीविषयीच चर्चा! किती दिवस जायचे? केव्हा? कोणत्या मार्गाने? बरोबर काय काय न्यायचे? खर्च किती? मुक्काम कुठे करायचा? असे अनेक प्रश्न निर्माण झाले. शेवटी सरांनी एक बैठक घेऊन कामांच्या याद्या केल्या व आमचे गट करून कामे वाटून दिली. संपर्काचे फोन करणे, भेटींच्या वेळा ठरवणे इ. ट्रॅव्हल एजंटना भेटून कमी दरात चांगली गाडी कोणाकडे मिळेल, यासाठी हेलपाटे घालून बस ठरवली. सर्व उरकता उरकता सहलीचा दिवस जवळ येत होता.

पहिल्या दिवशी ताम्हिणी घाटातून कोकणात उतरताना वाटेत ताम्हिणीचे सुंदर जंगल लागले. या घाटात एक प्रचंड घळई (गॉर्ज) आहे. घाट उतरत असताना **सह्याद्री पर्वतरांगा, लाव्हाचा थर, खडकांचे विविध प्रकार** पाहायला मिळाले.

कुडावळ्याला जाताना वाटेत सावित्री नदीची खाडी व मंडणगडचे पर्वतांतर्गत पठार लागले. कुडावळे येथे निसर्ग अभ्यासक दिलीप कुलकर्णी यांच्याबरोबर त्यांच्या घराजवळ असलेली **देवराई** पाहिली. **निसर्ग संवर्धन** व **पर्यावरण** समस्यांवर त्यांच्याशी झालेल्या गप्पांमुळे मजा आली. देवराईत निटम (अनावृत्तबीजी वनस्पती), हिरडा, बेहडा, सावर, कुडा, ऑर्किड, नेचे, दगडफूल, ब्राकेट फंगस यांसारख्या विविध वनस्पती, प्रचंड वेली पाहता आल्या. **जंगल परिसंस्थेची** ओळख झाली.

वाटेत आम्ही पन्हाळे (काजी) येथील प्राचीन लेणी पाहण्यास गेलो. तो एक लेण्यांचा समूह आहे व त्यावर बौद्ध पंथ, नाथ पंथ, गणेश पंथ आदींचा प्रभाव जाणवतो. दापोली येथील श्री. विष्णू सोमण यांच्यासोबत **लेण्यांचे वास्तुशास्त्र** अभ्यासण्यात, लेण्यातील विविध शिल्पांत कोरलेले महाभारत, रामायण आदीतले प्रसंग ओळखण्यात आम्ही रंगून गेलो होतो. या लेण्यांजवळून कोटजाई नदी वाहते. तिच्या काठाने हिंडताना **नदीच्या अवस्था, खनन, संचयन कार्य** आदींचा अभ्यास करता आला.

रात्री विश्रांतीपूर्वी दिवसभरात **पाहिलेल्या गोष्टींची उजळणी, टिपणे/नोंदी, नकाशे, रेखाटने पूर्ण करणे, गोळा केलेले नमुने योग्य प्रकारे साठविणे** आदी कामे तितक्याच उत्साहात केली.

दुसऱ्या दिवशी पानवळ येथील कोकण रेल्वेचा पूल पाहिला. आधुनिक वास्तुशास्त्राचा हा अप्रतिम नमुना आहे. गाडी जाताना पूल हादरताना अनुभवले आणि भौतिकशास्त्रातील नियम पहिल्यांदाच समजला. लोटे परशुराम येथील मंदिर पाहिले. वाटेत वासिष्ठी नदीची खाडी लागली. खारफुटी वनस्पती, भरती-ओहोटीचा खाडीवर होणारा परिणाम आदी गोष्टींची माहिती झाली. गणेशगुळ्याच्या पुळणीवर हिंडताना किनाऱ्यांचे प्रकार, समुद्रकडा, तरंगघर्षित मंच, लाटा, समुद्राचे संचयन, विविध समुद्री प्राणी व वनस्पती इ. गोष्टी पाहिल्या.

सकाळी लवकर उठून खास कोकणात असतात अशा देवळात उपासना केली व नंतर नारळी, पोफळी, आंबा, मिरी, लवंग, दालचिनी, जाम, रातांबा आदी वनस्पती पाहिल्या. रत्नागिरी येथे रत्नदुर्ग येथील सागरी गुहा पाहिली. रत्नागिरीच्या पुळणीवरून हिंडताना समुद्रामुळे होणारी धूप रोखण्यासाठी मानवाने केलेले विविध प्रयत्न समुद्राने कसे विफल केले हे जाणवत होते. नंतर आम्ही लावगण येथील बंदर पाहण्यास गेलो. बंदरात नांगरलेल्या मोठ्या बोटीवर छोट्या होडीतून जाऊन दोराच्या शिडीच्या साहाय्याने बोटीवर चढलो. बोटीवर इंजिन रूम, डेक, रडार यंत्रणा आदी गोष्टी बघितल्या. नंतर लावगण बंदराच्या निर्मितीसाठी झटणारे व्यवस्थापनप्रमुख श्री. दिलीप भटकर यांच्याशी झालेल्या गप्पांतून आम्हाला एका ध्येयवेड्या व्यक्तीचा परिचय झाला. लावगण हे एक खाजगी बंदर असून या बंदराचे एक वैशिष्ट्य म्हणजे हे भारतातील एकमेव बंदर आहे की जेथे मुलीदेखील जहाज दुरुस्तीचे काम करतात.

सहल संपवून पुण्यात आल्यावर आमचा पुढचा आठवडा सहलीचा अहवाल लिहिणे, अध्यापक, वर्गमैत्रिणींसमोर सहलीचे फोटो दाखवून माहिती सांगणे यात कसा संपला, हे कळलेच नाही. खरंच, या तीन दिवसांच्या सहलीत नियोजन कसे करायचे, निसर्गात हिंडत असताना कोणत्या गोष्टी बघायच्या, कशा बघायच्या, नोंदी कशा ठेवायच्या आदी गोष्टींची तोंडओळख झाली.


आजही एखाद्या सहलीचं नियोजन करताना या गोष्टी नकळत उपयोगी पडतात.



- प्रशांत दिवेकर

ज्ञान प्रबोधिनी, ५१४ सदाशिव पेठ, पुणे - ३०

## सहलींसाठी उपयुक्त पुस्तके (संदर्भासाठी)

| | |
|---|---|
| १) जिल्हावार गॅझेटियर्स | महाराष्ट्र शासन,पुणे जी.पी.ओ.जवळील शासकीय लेखा सामग्री विक्री भांडार |
| २) महाराष्ट्रातील वन्य प्राणी | सौ. शैलजा रॉबर्ट ग्रब, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई |
| ३) प्राणी सृष्टी - भाग १ व २ | डॉ. म. वि. आपटे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई |
| ४) महाराष्ट्राची प्राणी सृष्टी | प्रा. संजीव नलावडे, दास्ताने रामचंद्र आणि कं. |
| ५) सृष्टी ज्ञान-आकाश दर्शन अॅटलास | प्रा.गो. रा. परांजपे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ |
| ६) नक्षत्रलोक | पं. महादेवशास्त्री जोशी |
| ७) छंद आकाशदर्शनाचा | प्रकाश तुपे, ज्ञान प्रबोधिनी, पुणे |
| ८) अथातो दुर्गजिज्ञासा | प्र. के. घाणेकर |
| ९) साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची | प्र. के. घाणेकर |
| १०) जलदुर्गाच्या सहवासात | प्र. के. घाणेकर |
| ११) स्वराज्यातील तीन दुर्ग | ग. ह. खरे |
| १२) सह्याद्री | स. आ. जोगळेकर |
| १३) महाराष्ट्राची धारातीर्थे | पं. महादेवशास्त्री जोशी |
| १४) रायगडची जीवनगाथा | शां. दि. आवळसकर |
| १५) प्रतापगडचे युद्ध | कॅ. मोडक |
| १६) कथा महाराष्ट्राची दगडांच्या देशाची | श्री. निरंजन घाटे/सौ. सविता घाटे |
| १७) लोणार | प्र. के. घाणेकर |
| १८) आडवाटेवरचा महाराष्ट्र | प्र. के. घाणेकर |
| १९) आपली सृष्टी आपले धन भाग १,२,३ | विवेक परांजपे/मिलिंद वाटवे |
| २०) फुलपाखरांच्या जगात | श्री. अ.स. जोशी |
| २१) छान किती दिसते | युवराज गुर्जर |
| २२) कीटकांच्या दुनियेत | श्री. अ. स. जोशी, प्रसाद प्रकाशन, पुणे |
| २३) द बुक ऑफ इंडियन बर्डस | सलीम अली |
| २४) भारतीय पक्षी | डॉ. म. वि. आपटे |
| २५) वनश्री सृष्टी भाग १ व २ | डॉ. म. वि. आपटे |
| २७) वृक्षगान | डॉ. शरदिनी डहाणुकर |
| २८) सापांविषयी | झाई आणि रॉम व्हिटेकर, अनु.वसंत शिरवाडकर (नॅशनल बुक ट्रस्ट) |
| २९) भटकंतीतून विज्ञान | प्र. के. घाणेकर |
| ३०) महाराष्ट्र दर्शन | गो. नी. दांडेकर |












✻ सहल प्रमुखाचे नांव : संपर्क क्रमांक :

-----------------------------------------------------------------------

✻ उद्दिष्टे :

१.------------------------------------------------------------------

\- २.------------------------------------------------------------------

३.------------------------------------------------------------------

४.------------------------------------------------------------------

✻ स्थान निश्चिती

१. संभाव्य ठिकाणे------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२. मार्ग ------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

✻ कालावधी, तारीख/वार -------------------------------------------

-----------------------------------------------------------

✻ अभ्यासविषयक पूर्वतयारी

१. संदर्भ पुस्तके--------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२. स्लाईड शो/व्याख्याने--------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

✻ व्यवस्थापनात्मक मुद्दे

१. मार्गदर्शकांची संख्या व नावे-------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

२. प्रवास व्यवस्था-------------------------------------------------------

अ) पर्यायी व्यवस्था----------------------------------------------------

ब) आरक्षण ----------------------------------------------------------

संपर्क ------------------------------------------------------------

३. साहित्य व्यवस्था

अ) गटाचे साहित्य-------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

ब) वैयक्तिक साहित्य----------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

क) संदर्भ साहित्य ------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

ड) बरोबर घ्यायच्या वस्तू/उपकरणे------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

४. निवास/भोजन व्यवस्था---------------------------------------------------

संपर्क ----------------------------------------------------------------

५. वैद्यकीय व्यवस्था------------------------------------------------------

६. वाटाड्या -------------------------------------------------------------

७. सहलीतील कार्यक्रमांची योजना------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

८. आर्थिक व्यवस्था

अ) अंदाजे खर्च------------------------------------------

ब) जमा ------------------------------------------

क) उचल ------------------------------------------

ड) हिशोबी/नोंदी करणारी व्यक्ती ------------------------------------------

इ) खर्च करणारी व्यक्ती ------------------------------------------

* खात्यांचे तपशील व वाटप------------------------------------------

* सहल मार्गदर्शक पुस्तिका------------------------------------------

* सहलीच्या दरम्यान :

अ) दिन प्रमुख अध्यापक ------------------------------------------

ब) दिन प्रमुख विद्यार्थी ------------------------------------------

क) मार्गदर्शक ------------------------------------------

* सहलीनंतर करावयाची कामे

अ) आभार पत्रे------------------------------------------

------------------------------------------

ब) अहवाल लेखन------------------------------------------

------------------------------------------

क) निवेदन ------------------------------------------

------------------------------------------

* प्रवास मार्गदर्शक तक्ता

| दिवस | प्रवास<br>_____ ते _____ | अंतर | वेळ | भेटीचे ठिकाण | लागणारा वेळ | संपर्क व्यक्ती/<br>पत्ता/दूरभाष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

# ज्ञान प्रबोधिनी

## शिक्षक प्रबोधन मंच

### उद्‌घाटन कार्यक्रम

...व्यक्ती ही सामाजिक वस्तू नसून भावभावना असलेली, इच्छा आणि स्वप्ने असलेली, आणि विचार व प्रयत्न करू शकणारी, समाजाला चैतन्यपूर्ण बनवणारी शक्ती आहे, हे लक्षात ठेवावे लागते. आपल्याला शिक्षणामध्ये सामाजिक वस्तूंवर प्रक्रिया करायची नसून समाजाच्या शक्तिस्रोतांना मोकळे करायचे आहे, व त्या शक्तिप्रवाहाला दिशा द्यायची आहे....

**मनुष्यघडणीसाठी शिक्षण भाग १ व २**
या शैक्षणिक साहित्याला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचेकडून उत्कृष्ट शैक्षणिक साहित्याचा पुरस्कार प्राप्त.

## शिक्षक प्रबोधन मंच

### उद्‌घाटन कार्यक्रम

दिनांक : १७ डिसेंबर २०१४ वेळ : सायं.४.०० ते ६.००

ठिकाण : प्रबोध सभागृह, ज्ञान प्रबोधिनी, ५१४, सदाशिव पेठ, पुणे ३०

**विषय – 'मनुष्य घडणीसाठीचे शिक्षण'**
**प्रमुख वक्ते : वाच. गिरीशराव बापट**

संपर्क – ०२०२४२०७१९३ / ९८२२६६०६८३

## Website Links

www.trekdi.com

www.flowersofsahyadri.com

www.culturalindia.net


www.maharashtratourism.gov.in

www.indiabiodiversity.org

www.mapsofindia.com

www.redcross.org.uk/en/What-we-do/Teaching-resources/Lesson-plans/First-aid-education-for-young-people






ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
✆ २४२०७१९३, २४२०७१९४
E-mail: erc@jnanaprabodhini.org
Visit us at: www.erc-pune.org